REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

भारतीय दर्शनातील निर्णय संकल्पना

युवराज विश्वनाथ पाटील

निर्णय शब्दाची व्याख्या:-

निर्णय (निर्वचन)

निरुक्त हा शब्द 'निर्' उपसर्गपूर्वक 'वच्' धातुला 'क्त' प्रत्यय लागून ('निर् + वच् + (क्त) त') असा बनलेला[१] आहे. याचा अर्थ 'निर्' म्हणजे निश्चितपणे, निश्चयात्मक, 'वच्' म्हणजे बोलणे. 'निर्वच' म्हणजे निश्चयाचे बोलणे. पुढे 'क्त' हा प्रत्यय (भू. धा. सा. विशेषण) लावून 'निरुक्त' म्हणजे निश्चितरुपाने बोललेले, सांगितलेले (तत्त्व किंवा शास्त्र). या सर्वांचा एकत्रित अर्थ होतो 'निश्चयात्मकपणे सांगितलेले' (पूर्णपणे सांगितलेले शास्त्र). संस्कृत विद्वान आचार्य दुर्ग यांच्या मते याचा अर्थ 'गुह्य अर्थ सांगणे'[२] असा आहे. सामान्यपणे शब्दाची व्याख्या करणाऱ्या पद्धतीला 'निरुक्त' किंवा 'निर्वचन' म्हणतात.

न्याय दर्शनात निर्णयाची संकल्पना:-

महर्षी गौतम यांनी आपल्या 'न्याय दर्शन' मध्ये म्हटले आहे, **'विमृश्यपक्ष प्रतिपक्षाभ्यामर्थावधारणं निर्णय:'** (१-१-४१).[३] एखाद्या पदार्थाविषयी संशय असल्यास पक्ष आणि विपक्ष या युक्त्यांनी त्याचं यथार्थ रूप समजून घेणं याला 'निर्णय' म्हणतात. उदा. रात्री दोरीवर सर्पाचा भास होतो पण प्रकाश करुन पाहिल्यास आपला भ्रमनिरास होतो. त्याच्या पक्ष आणि विपक्षाच्या लक्षणांनी आपल्याला समजतं की ही दोरी आहे, सर्प नाही. या यथार्थ ज्ञानालाच 'निर्णय' म्हणतात. संस्कृत शब्दकोशातही निर्णयाचा अर्थ 'एखाद्या विवाद्य विषयाबद्दल स्थिर केलेलं मत' असा दिलेला आहे. ब्राह्मण ग्रंथात 'निरुक्त' या शब्दाचा उपयोग 'देवता स्वरूप निरुपण' या अर्थाने केलेला आहे.म्हणजे ब्राह्मण ग्रंथात निरुक्त शब्द 'देवविद्या' या संदर्भातच वापरलेला आहे. शंकराचार्यांच्या मतेही निरुक्ताचा विषय 'देवविद्या' हाच आहे.

निरुक्ताच्या दोन पद्धती आहेत. (१) शब्द निर्वचन आणि (२) अर्थ निर्वचन. शब्द निर्वचनात व्याकरणाचा भाग आहे आणि अर्थ निर्वचनात सरळ-सरळ अर्थ करण्याचा प्रकार आहे.

महानुभाव तत्त्वज्ञानात निर्णयाची संकल्पना:-

महानुभाव तत्त्वज्ञानाचे अर्थनिर्णयशास्त्र 'लक्षणरत्नाकर' यात निर्णयाची व्याख्या अशी दिली आहे - **'निश्चयार्थो निर्णय:। स त्रिविध:। शब्दसंप्रदायार्थरहस्याख्य: ।'**[४] निश्चपूर्वक अर्थसिद्धी करून देणाऱ्या वाक्याला 'निर्णय' असे म्हणतात. तो तीन प्रकारचा आहे. (१) शब्द निर्णय (२) संप्र-दायार्थ निर्णय आणि (३) रहस्य निर्णय. व्याकरण शास्त्राने शब्द निर्णय कळतो अभ्यास, श्रवण, मनन, निदिध्यासन याने संप्रदाय निर्णय कळतो आणि गुरुमुखाने रहस्य निर्णय कळतो.

या निर्णयांचे प्रयोजन काय?:-

'हीनाचेया व्यावृत्ती उच्चाचा निर्धार होआवा लागे । तयाचेया ज्ञानालागी निर्णय ।'[५] (ब.ल.टीप-८०). म्हणजे हीन वस्तूची व्यावृत्ती आणि उच्च वस्तूची प्रतिष्ठा, निर्धार करण्यासाठी निर्णयांची आवश्यकता. **'अर्थेकरुनि साजात्य वैजात्याचा तिरस्कारु करीती : आणि लक्षाचा निर्धारु करीती : भणौनि : ।'** [६](ब.ल.टीप-८३). २

साजात्य वैजात्य लक्षणांची व्यावृत्ती करुन लक्षाचा निर्धार करतात म्हणून निर्णयांची आवश्यकता. **'जया पदार्थाचे जैसे स्वरूप : तें तैसेंचि निश्चयार्थे निर्वचिजे : तो निर्णय : ।**$_{७}$ (ब.ल.टीप–८०). **निर्णयोऽवधारणज्ञानम् । तच्च प्रमाणानां फलम् ।८** (तर्कभाषा, हिंदी,२४३). निर्णय हे निश्चयात्मक ज्ञान असतं आणि ती प्रमाणांची फलश्रुती असते.

मीमांसा दर्शनात निर्णयाची संकल्पना:–

मीमांसा दर्शनाचं सर्वात प्राचीन नाव 'न्याय' आहे. या दर्शनाच्या न्यायकणिका, न्यायमाला विस्तार इ. ग्रंथातही न्याय शब्दाचा प्रयोग यामुळेच केलेला आहे. मीमांसा शास्त्राचा मुख्य विषय समीक्षा करणे असा आहे. मीमांसा शब्दाचा अर्थ आहे एखाद्या वस्तूच्या स्वरुपाचा यथार्थ निर्णय. पाणिनी सूत्रावरील (३.१.५.६) काशिकावृत्तीमध्ये 'मीमांसा' शब्दाचा अर्थ 'शोध करून अंतीम निर्णय करणे' असा दिलेला आहे. वरील विविध संदर्भावरून असे दिसून येते की, मीमांसा शब्दाचा अर्थ 'एखाद्या विषयाबाबत येणाऱ्या शंकेचा निर्णय करणे असाही होऊ शकतो. वेदातील वाक्यांचा अर्थनिर्णय करण्यास सर्वप्रथम मीमांसकांनी सुरुवात केल्याचे दिसून येते. वेदांचा अर्थ लावण्यासाठी त्यांनी एक मोठी परंपरा निर्माण केली. यात जैमिनींचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. अर्थ विषयक शास्त्राच्या नियमांचे स्पष्ट निवेदन फक्त मीमांसा शास्त्रातच आढळते. वैदिक वाक्यांविषयी संशय निर्माण झाल्यावर ऋषिमुनींनी युक्ती आणि तर्काच्या साह्याने केलेला योग्य निर्णय संहिता, ब्राह्मण व उपनिषद यात आढळून येतो. तर्काने संदिग्ध विषयाचा निर्णय करणारे दार्शनिक मीमांसक हेच प्रथम नैयायिक आहेत. मीमांसा शास्त्राचा मुख्य विषय धर्म विवेचन आहे. **'धर्माख्यं विषयं वक्तुं मीमांसाया प्रयोजनम्.**''मीमांसते' क्रियापद आणि 'मीमांसा' नाम दोघांचा प्रयोग ब्राह्मण, संहिता, आणि उपनिषद यात सापडतो. 'मीमांसते' या धातुरूपात याचा वापर बऱ्याच ठिकाणी केलेला आढळतो. 'सैषा आनन्दस्य मीमांसा भवति' या उद्धृतांशाची समीक्षा केल्याने असे म्हणता येईल की, श्रुतिकाळातच श्रौतविषयक कर्मात उपलभ्यमान विरोधाकडे प्राचीन ऋषिमुनींचं लक्ष गेलं होतं आणि त्यांनी यासाठी सिद्धांतांची शोधनी केलेली आढळून येते. यावरून मीमांसा दर्शनाची निर्मिती फार प्राचीन काळी झाली आहे असे दिसते.

वेदाचे दोन भाग आहेत कर्मकांड आणि ज्ञानकांड. यज्ञयागादी विधी आणि अनुष्ठान यांचं वर्णन हा कर्मकांडाचा विषय आहे आणि जीव, जगत, ईश्वराचं स्वरुप आणि यातील परस्पर संबंध हा ज्ञानकांडाचा विषय आहे. मीमांसा शास्त्रात वैदिक कर्मकांडविषयक श्रुतींमधील पारस्परीक विरोधाबद्दल निर्णय केल्याचे दिसून येते. कर्म विषयक विरोधाभासांचे निराकरण कर्म–मीमांसा करते आणि ज्ञान विषयक विरोधाभासांचे निराकरण ज्ञान–मीमांसा करते.

भारतीय दर्शनातील मीमांसा दर्शनाचा विचार केला असता पूर्व–मीमांसा दर्शन वेदातील मंत्रांचा योग्य अर्थ निर्धारण करण्यासाठी उदयास आल्याचे दिसून येते. थोडक्यात असे म्हणता येईल की, एकुण भारतीय दर्शनांमध्ये मीमांसा हे दर्शने निर्णयांबाबत अधिक विस्तारपुर्वक व स्पष्टपणे बोलतांना दिसून येते.

मीमांसा शास्त्राची आवश्यकता

मीमांसा दर्शनाच्या विकासाचं कारण, कर्माची यथार्थता प्रमाणित करणे हा आहे. असं म्हटलं जातं की, कर्म आणि त्यावेळी प्रचलित असलेल्या चालीरीती याविषयी लोकांमध्ये संशय निर्माण झाला होता. लोकांचा असा समज होता की हवन, पशुबळी हे सर्व निरुपयोगी आहे. मंत्रब्राह्मणादिकांचे भिन्न भिन्न अर्थ निरनिराळ्या लोकांकडून करण्यात येऊ लागले होते. त्यामुळे प्रत्येक कर्माचा अर्थ लावणे आणि त्याचे फळ काय मिळेल हे समजाऊन सांगणे याची गरज भासू लागली. मीमांसा शास्त्राची रचना याच उद्देशाने झाली.३

मीमांसा शास्त्रात संहिता, ब्राह्मण आणि कल्पसूत्रे (श्रौतसूत्रे) यांचा अंतर्भाव होतो. जैमिनींनी रचलेल्या पूर्वमीमांसेची जी सूत्रे आहेत त्यांची वैदिक वाङ्मयात आवश्यकता कुठे पडते? याचे उत्तर असे आहे की, निरनिराळ्या ब्राह्मण ग्रंथांतून निरनिराळ्या यज्ञयागादीकांची निरनिराळी वर्णने दिलेलीं आहेत. त्यांची एकवाक्यता करण्याकरता या मीमांसाशास्त्राची आवश्यकता लागते. ब्राह्मण ग्रथांमध्ये एखादे वाक्य आले असता, त्या वाक्यात विधि सांगितला आहे किंवा अर्थवाद सांगितला आहे; श्रुति आणि स्मृति यांच्यामध्ये विरोध आला असता कोणाचे प्रामाण्य मानावे; उद्भिदादिकासारखे शब्द ब्राह्मणातील काही वाक्यांमधून आले, तर त्यातील उद्भिद् हा शब्द यागाचे नामधेय आहे किंवा यागाचा गुण आहे; श्रुति, लिङ्ग इत्यादी प्रमाणांमध्ये जास्त प्राबल्य कोणाचे मानावे? मंत्रपाठामध्ये एक क्रम सांगितलेला असला आणि ब्राह्मणामध्ये त्याहून भिन्न असा क्रम सांगितलेला असला, तर त्यापैकी प्रमाणभूत असा कोणता क्रम मानावा? कोणती यागादिक कर्मे करण्याचा कोणाला अधिकार असतो आणि कोणाला नसतो? असे एक ना अनेक प्रश्न उद्भवतात.याचा निर्णय कशाच्या आधाराने करावयाचा?तर हा निर्णय करण्याला मीमांसा शास्त्र हेच समर्थ आहे.

या शास्त्रातील पहिल्याच सूत्रावरील भाष्यामध्ये या शास्त्राच्या प्रतिपादनाला आरंभ करावा किंवा न करावा, अशी एक शंका उपस्थित करण्यात आलेली आहे. व अशी शंका उत्पन्न झाली असता त्यावर पूर्वपक्षी असे म्हणतो की, या मीमांसाशास्त्राच्या प्रतिपादनाला आरंभ करण्याची मुळीच काही आवश्यकता नाही. कारण, संहिता, ब्राह्मण वगैरे वैदिक ग्रंथांतून काय सांगितले आहे, हे तुम्हाला समजले पाहिजे एवढाच तुमचा हेतू आहे. तर व्याकरण, निरुक्त वगैरे शास्त्राचे अध्ययन केले म्हणजे वेदाचा अर्थ समजेल. मग त्यासाठी मीमांसाशास्त्राची आवश्यकता कशाला; परंतू यावर सिद्धांती याने असे सांगितले की, केवळ शब्दार्थाच्या ज्ञानाने वेदातील तात्पर्याचे ज्ञान होणे शक्य नाही. व हे आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी त्याने 'अक्ता: शर्करा उपदधाति' (येथे शर्करा म्हणजे मातीत मिसळलेले (चुनखडीच्या खड्यासारखे) दगड, वाळू असा अर्थ आहे). या वाक्याचे एक उदाहरण दिलेले आहे. या वाक्यातील प्रत्येक शब्दाचा अर्थ जरी एखाद्याला समजला तरी या शर्करांचे अंजन (चोपडणे, माखणे, लावणे) तुपाने, तेलाने की, वसादिकांनी, कशाने करावयाचे? अशी शंका उपस्थित झाली असता त्या शंकेचे समाधान कोणते व्याकरण किंवा कोणते निरुक्त करू शकणार आहे?तर त्याच्यासाठी येथे मीमांसाशास्त्राचीच आवश्यकता आहे. कारण या प्रकरणाच्या वाक्यांमध्ये 'तेजो वै घृतम्' असे वचन आलेले असल्यामुळे त्यावरून येथे घृतादि आणि तैलादिकाने नव्हे, शर्करांचे अंजन करावयाचे आहे हा निर्णय मीमांसाशास्त्रच करू शकते. अशा प्रकारची शंकास्थळे वेदातील वाक्यांचे अर्थ लावतांना किती तरी वेळा पूर्वी उत्पन्न झालेली असली पाहिजेत व त्यांच्या निर्णयाबद्दलचे वादविवाद हेही निरनिराळ्या पक्षांमध्ये पूर्वी चालू असले पाहिजेत. ब्राह्मणग्रंथ लिहीण्याची पद्धत अशा प्रकारची आहे की, तिच्यामध्ये संशय उत्पन्न होण्याला पुष्कळ जागा राहते. एका शाखेत एक गोष्ट सांगितलेली असली तर दुसऱ्या शाखेमध्ये त्याच्यासंबंधीची दुसरी गोष्ट सांगितलेली असते. संहितेत एक गोष्ट सांगितलेली असली तर त्याच्याहून भिन्न अशी गोष्ट ब्राह्मणामध्ये सांगितलेली असते. मंत्रामध्ये एक क्रम सांगितलेला असला तर त्याच कर्माचा ब्राह्मणातील क्रम निराळाच सांगितलेला असतो. 'अग्निहोत्रं जुहोति', 'यवागुं पचति' इत्यादी ठिकाणी अग्निहोत्रामध्ये हवन करण्याकरीता यवागुचा पाक आधी तयार होणे जरी आवश्यक आहे तरी ब्राह्मणमध्ये 'अग्निहोत्रं जुहोति' हे वाक्य आधी आलेले असून 'यवागु पचति' हे वाक्य त्याच्यानंतर सांगितलेले आहे. ब्राह्मणमध्ये अनेक याग सांगितलेले असतात; परंतू त्यातील प्रकृतियाग कोणते आणि त्यांच्यया विकृति कोणत्या आणि त्या विकृतियागांमध्ये कोणकोणती ४ अंगे स्वीकृत करावयाची याचा स्पष्ट निर्णय केलेला नसतो. कित्येक वेळा ब्राह्मणग्रंथातून 'उदिते जुहोति' 'अनुदिते जुहोति' 'अतिरात्रे षोडशिनं गृह्णाति' 'नातिरात्रे षोडशिनं गृह्णाति' अशा प्रकारची परस्परविरुद्ध वाक्ये येतात. अशा अनेक प्रकारच्या अडचणी ब्राह्मणग्रंथातील वचनांचे अर्थ लावतांना उत्पन्न होतात. असे प्रसंग उत्पन्न झाले असता पूर्वी त्यांच्यावर उभयपक्षी मीमांसाशास्त्राच्या अनुरोधाने वादविवाद होऊन निर्णय ठरविण्यात येत असले पाहिजेत व त्या निर्णयांच्या अनुरोधाने पूर्वी सांगितलेल्या निरनिराळ्या कल्पसूत्रातील प्रयोग प्रस्थापित केले गेले असले पाहिजेत. जैमिनी सूत्र १ पाद ३ यात कल्पसूत्रांचे अस्वत:प्रामाण्य या नावाचे एक सातवे अधिकरण आहे. त्यामध्ये बौद्धायन, आपस्तंब, आश्वलायन, कात्यायन इत्यादीकांच्या नावांनी प्रचलीत असलेली जी कल्पसूत्रे ती वेदाप्रमाणे स्वत:प्रमाण आहेत किंवा नाहीत, असा संशय उत्पन्न करून त्यांना स्वर नाहीत व ती बौद्धायन, आपस्तंब वगैरे पुरुषांनी निर्माण केली आहेत यासाठी ती कल्पसूत्रे पौरुषेयच असली पाहिजेत असा निर्णय ठरविण्यात आलेला आहे. या अधिकरणावरून कल्पसूत्रांच नंतर जैमिनींची मीमांसासूत्रे उत्पन्न झाली असली पाहिजेत असे सकृत दर्शनी दिसते; परंतू मीमांसाशास्त्रातील न्यायांच्या अनुरोधाने ब्राह्मणग्रंथातील विस्कळीत आणि संशयास्पद वाक्यांचा निष्कर्ष काढून कल्पसूत्रातील यागादिकांचे नियम बांधण्यात आल्यानंतर फिरून त्याच कल्पसूत्रांचे प्रामाण्य कितपत मानले पाहिजे, त्या कल्पसुत्रांचे वेदतुल्य प्रामाण्य मानावे किंवा ते पौरुषेय ग्रंथ आहेत असे मानावे? असा त्यांच्याबद्दलचा प्रश्न आणखी आपणच उपस्थित करून त्याच मीमांसूत्रांनी त्यांना वेदाइतके प्रामाण्य नाही असा सिद्धांत प्रस्थापित केला तर त्यात काही फारसे अशक्य आहे असे नाही.

मीमांसाशास्त्राची थोडक्यात पुष्कळ माहिती प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने आपदेव याचा पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा यावरील 'मीमांसान्यायप्रकाश' हा ग्रंथ फार महत्वाचा आहे. आपदेव याने लिहील्यामुळे याला आपदेवी असेही म्हटले जाते.या ग्रंथाला प्रकरणग्रंथ म्हणूनही संबोधले जाते.वृत्ती, शाबरभाष्य, प्रभाकराची ब्रहत् टीका, कुमारिलस्वामीची वार्तिके हे सर्व ग्रंथ सूत्रप्रधान आहेत. आपदेवी, अर्थसंग्रह वगैरेंसारखे जे संक्षिप्त ग्रंथ निर्माण झाले त्यात मीमांसाशास्त्रातील निरनिराळी प्रकरणे घेऊन त्यांचे प्रतिपादन करण्यात आलेले आहे म्हणून यांना प्रकरणग्रंथ म्हणतात.

वेदामध्ये उपनिषदादिक जो उत्तरभाग आहे, तो वगळता बाकीच्या मंत्रब्राह्मणादिक वेदाच्या पूर्वभागात यज्ञयागादिकाच्या संबंधाने अनेक विधाने सांगितलेली आहेत. त्यांची व्यवस्था कशी लावायची, त्यातील विधि कोणते आणि अर्थवाद कोणते, त्यांच्यातील शेषशेषिभाव कसा ठरवायचा, त्यांच्या अनुष्ठानाचा क्रम कसा असावा, त्यातील कर्माचे कधिकारी कोण असावेत, त्यांचे प्रकृतिविकृतिभाव कसे ठरवावे, त्यातील कोणत्या विधानांचे अतिदेश कोठे करावे आणि कोठे करू नये वगैरे अनेक प्रकारचे प्रश्न त्या वेदवचनांचे अर्थ लावतांना उत्पन्न होतात. या सर्व प्रश्नांचा उहापोह जैमिनिंनी त्यांच्या पूर्वमीमांसादर्शनात केला

आहे. या मीमांसाशास्त्राचा सांगोपांग विचार करण्यासाठी जैमिनीने आपल्या मीमांसादर्शनामध्ये एकंदर २७४५ सूत्रे रचली असून त्यातील विषयविभागाच्या दृष्टीने या सर्व सूत्रांचे मिळून एकंदर बारा अध्याय केले आहेत. त्यापैकी पहिल्या सहा अध्यायांना 'पूर्वषट्क' आणि पुढील सहा अध्यायांना 'उत्तरषट्क' असे म्हणतात. या बारा अध्यायांचे साठ पाद आहेत. या पादांमध्ये कित्येक अधिकरणेन (न्याय किंवा निर्णय) आहेत. या अधिकरणात विषय, शंका, पूर्वपक्ष, पूर्वपक्षाचे खंडन व निर्णय अशी प्रमुख पाच अंगे असतात. मीमांसाशास्त्रातील या अधिकरणांची संख्या सुमारे एक हजार आहे. जैमिनीने आपल्या पूर्वमीमांसादर्शनाच्या द्वादश अध्यायांमध्ये मीमांसाशास्त्राचे सर्व सिद्धांत सांगितले आहेत म्हणून या शास्त्राला 'द्वादशलक्षणी' असेही म्हटले जाते. ५

संदर्भ सूची

१. १) आपटे, वामन शिवराम., संस्कृत हिंदी शब्दकोश, मोतीलाल बनारसीदास, बंगलो रोड, जवाहरनगर, दिल्ली-७, तृतीय आवृत्ती, पान. क्र. - ५३५, (२) शास्त्री, पं. शिवनारायण., निरुक्त, इंडोलॉजिकल बुक हाऊस, दिल्ली, १९७५, प्रथमावृत्ती, पान क्र.-१.

२. शास्त्री, पं. शिवनारायण., निरुक्त, इंडोलॉजिकल बुक हाऊस, दिल्ली, १९७५, प्रथमावृत्ती, पान क्र.-१.

३. पं. श्रीराम शर्मा आचार्य, न्यायदर्शन, संपादक - पं. श्रीराम शर्मा आचार्य, प्रकाशक-संस्कृति संस्थान, ख्वाजा कुतुब, (वेदनगर), बरेली, (उ.प्र.), द्वितीय आवृत्ती, १-१-४१, पान क्र. ४३, १९७६.

४. नेने, ह. ना., लक्षणरत्नाकर, प्रकाशक-रघुनाथ महादेव दिवेकर, यशोदा चिंतामणी ट्रस्ट, १९३७, क्र.-७, पान -२९.

५. तत्रैव, बत्तीस लक्षणाची टीप, पान क्र.-८०.

६. तत्रैव, पान क्र.-८३.

७. तत्रैव, पान क्र.-८०.

८. आचार्य, विश्वेश्वर., तर्कभाषा, चौखम्भा संस्कृत संस्थान, वाराणसी, पान क्र.-२४३.

युवराज विश्वनाथ पाटील